जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे.

दि. ३१ डिसेंबर, २०२५

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, ठाणे

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम – 2005

कलम 4 (1) (b) (i)

ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालय या प्राधिकरणाची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

कार्यालयाचे नांव	:	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे.
पत्ता	:	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे. नवीन इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय समोर, कोर्ट नाका, ठाणे (प) – 400 601.
कार्यालय प्रमुख	:	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे.
शासकिय विभागाचे नांव	:	विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई–400 032.
कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त	:	विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई–400 032.
कार्यक्षेत्र	:	ठाणे जिल्हा
भौगोलिक	:	ठाणे जिल्हा
कार्यानुरुप	:	– –
विशिष्ट कार्य	:	न्यायदान.
विभागाचे ध्येय / धोरण	:	कायद्यातील तरतुदीनुसार न्याय देणे.
धोरण	:	कायद्यातील तरतुदीनुसार न्याय देणे.
सर्व संबंधीत कर्मचारी	:	न्यायीक अधिकारी व कर्मचारी वर्ग – 2, 3, 4.

कार्य : **कर्तव्य सुचीप्रमाणे व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी वेळोवेळी केलेल्या आदेशान्वये.**

कामाचे विस्तृत स्वरुप :

1. **ठाणे जिल्ह्यातील सेशन व सर्व प्रकारचे विशेष खटले चालविणे.**
2. **दिवाणी न्यायालय, व न्याय दंडाधिकारी न्यायालये यांच्या निकाला विरुध्द करण्यात आलेली अपील चालविणे.**
3. **विशेष अधिकारानुसार मोटार अपघात नुकसान भरपाई बाबतची प्रकरणे चालविणे.**

मालमत्तेचा तपशील :

१. <u>जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे</u>

जिल्हा व न्यायालय, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, कोर्ट नाका, ठाणे—पश्चिम, पिन कोड नं. ४०० ६०१.

ठाणे न्यायालयाच्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ १६,४३५.६० चौ.मी. आहे. पुर्वी ठाणे जिल्हा न्यायालयाचे कामकाज पेशवे वाड्यात चालत असे. जानेवारी, १९०० मध्ये मा. श्री. जे. आय. हिटन हे जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

सन १९६८—६९ साली सध्याची जिल्हा न्यायालयाची नवीन इमारत बांधण्यात आली. सदरच्या इमारतीस जोडुन विस्तारित इमारत सन २००२ साली बांधण्यात आली. तसेच सदर भूखंडावर सन २००९ साली कौटुंबिक न्यायालय व जलदगती न्यायालयाची इमारत बांधण्यात आली.

मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाची जुनी बैठी इमारत मोडकळीस आली असल्याने सदर वास्तु पाडून त्याजागी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची 'न्याय सेवा सदन' (अे.डी.आर. सेंटर) या स्टील्ट + २ या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे.

जिल्हा न्यायालयाच्या आवारात सध्या जिल्हा व सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर व मुख्य न्यायदंडाधिकारी, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग यांची एकुण ३८ न्यायालये कार्यरत आहे.

त्यामध्ये मोटर अपघात दावा न्यायाधिकरण यांचेकडील प्रलंबीत प्रकरणे चालवण्यासाठी १४ व्या वित्त आयोगांतर्गत अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश या संवर्गाचे न्यायालय नुकतेच कार्यरत झालेल्या न्यायालयाचा समावेश आहे. जिल्हा न्यायालय ठाणे येथे ई—सेवा केंद्र दि.३१/०७/२०२१ या तारखेपासून सुरु करण्यात आले.

याशिवाय जिल्हा न्यायालयाच्या आवारात कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय अशी न्यायालये व त्यांची कार्यालये कार्यरत आहेत.

सदर भूखंडावर खालीलप्रमाणे न्यायालयाच्या इमारती आहेत:—

अ.क्र	**इमारतीचे नांव**	**मजल्यांची संख्या**	**बांधकामाचे वर्ष**	**न्यायदान कक्ष**
१	जिल्हा न्यायालय नवीन इमारत	तळमजला + ८	२०१९—२०२५	२२
२	जिल्हा न्यायालय मुख्य इमारत (जुनी)	तळमजला + २	१९६८—१९६९	१५
३	जिल्हा न्यायालय विस्तारित इमारत	तळमजला + २	२००१—२००२	१५
४	जलदगती न्यायालय व कौटुंबिक न्यायालय इमारत	तळमजला + ४ मजले तळमजला +२ मजले हे जलदगती न्यायालयासाठी व तीसरा व चौथा मजला कौटुंबिक न्यायालयाचे वापरात आहे.	२००९—२०१०	६+२
५	पहिले व दुसरे न्यायालय	बैठी कौलारु इमारत	१९०८—१९०९	२
६	सहकार न्यायालय	बैठी कौलारु इमारत	१९०५—१९०६	१

जिल्हा न्यायालयाची वास्तु सध्या अपुरी पडत असल्याने जिल्हा न्यायालयाच्या मागील बाजुस असलेले पहिले व दुसरे न्यायालय, सहकार न्यायालय व वर्ग—३ कर्मचा—यांची निवासस्थाने तोडुन त्याजागी जिल्हा न्यायालयाची बहुमजली इमारत बांधण्याचा प्रस्तावास शासनाने सीसीबी—१११४/१०६५/प्र.क्र.१८८/का.१३ दि.०९—०६—२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा न्यायालय, ठाणे येथील नवीन

इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून सदर इमारतीचे उद्घाटन दि. २६/०४/२०२५ रोजी झाले आहे व दि.२६/०४/२०२५ पासून जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश या संवर्गातील न्यायालये व संबंधित कार्यालयांचे कामकाज नवीन इमारतीमध्ये सुरू झाले.

बारा बंगला, कोपरी, ठाणे (पूर्व) येथे न्यायाधीशांकरीता एकूण २६ अभिहंस्तांकित शासकीय निवासस्थाने उपलब्ध आहेत.

२. **<u>बेलापूर, (तालुका ठाणे) येथील न्यायालय.</u>**

''वाशी'' न्यायालयाचे नामकरण ''बेलापूर'' असे खालील नमूद आदेशानुसार करण्यात आले आहे.

1	**विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा पृष्ठांकन क्र.— SANKIRNA 0321/107/C.R.44/DESK-11,Law and Judiciary Department, Mantralya, Mumbai- 400 032, Date-09-05-2022 सोबत दि. ०६.०५.२०२२ चे राजपत्र असाधारण भाग—चार—अ.**
2	**मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र -B(W)A-1222/1998/ 1207/18936, Date-15 June,2022**
3	**जिल्हा न्यायालय, ठाणे यांचा आदेश म.जा.क्र.प्रशा./४३००/२०२२, दि.१८.०६.२०२२.**

बेलापूर, नवी मुंबई येथे न्यायसंकुल बांधण्यासाठी जनहित याचिका क्र.१८/२००७ मधील दि.०३.०५.२००७ रोजीच्या आदेशानुसार सीबीडी बेलापूर येथील सेक्टर १५ मधील भूखंड नं.२० ते २२ व ३० ते ३२ अंदाजे क्षेत्र १९.४९९.२० चौ.मी.या जमिनीचा ताबा दि. ०६.०६.२००७ रोजी या कार्यालयाकडे सुपुर्द करण्यात आलेल्या भूखंडावर पहिल्या टप्यात २० न्यायदान कक्ष असलेली जिल्हा न्यायालयाची इमारत व न्यायाधीशांकरीता २० निवासस्थाने बांधकाम पूर्ण झाले आहे. दि. १०.०५.२०१७ रोजी सदर इमारतीचा उद्घाटन समारंभ झाला.

बेलापूर न्यायालयाच्या आवारात सध्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग यांची एकुण २० न्यायालये कार्यरत आहे.

३. **<u>मिरा—भाईंदर, ता. ठाणे येथील न्यायालय</u>**

मौजे घोडबंदर, तालुका व जिल्हा ठाणे येथील सर्व्हे नं. २३३ या भुखंडामधील उपलब्ध जागेपैकी क्षेत्र ४३५३.३७ चौ. मी. या जमिनीचा ताबा

दिनांक १४—०५—२०११ रोजी घेण्यात आला.

सदर जागेवर ०६ न्यायदानकक्षांची न्यायालयीन इमारत (तळमजला+३) बांधण्याच्या कामास शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र. सीसीबी—२०१२/७८६/प्र.क्र.१५५/का.१३, दिनांक ११—०३—२०१३ व न्यायाधीशांसाठी ०६ निवासस्थाने बांधणेच्या कामास शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र. सीआरक्यू —२०१२/७८६/प्र.क्र.१५६/का.१३, दि. २१—०६—२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. दि.०८/०३/२०२५ रोजी सदर इमारतीचे उद्घाटन समारंभ झाले असून तीन दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांची न्यायालये कार्यरत आहेत.

४. <u>तालुका कल्याण येथील न्यायालय</u>

कल्याण रेल्वे स्थानकाजवळ, मुरबाड रोड, कल्याण (प), पिन ४२१ ३०१

सदर इमारतीच्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ १०,०७२.०० चौ.मी. आहे. त्यावर खालीलप्रमाणे न्यायालयाच्या ०३ इमारती आहेत.

अ.क्र	इमारतीचे नांव	मजल्यांची संख्या	बांधकामाचे वर्ष	न्यायदान कक्ष
१	जुनी इमारत	बैठी कौलारु इमारत	१९०८—१९०९	०४
२	नवीन इमारत	तळमजला + १	१९७२—१९७३	०७
३	जलदगती न्यायालय इमारत	तळमजला + २	०६—०२—२००३	०९

कल्याण येथे अपर जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, या संवर्गातील एकुण २१ न्यायालये कार्यरत आहेत.

कल्याण न्यायालयाचे आवारात न्यायाधीशांकरीता ०६ अभिहंस्तांकित निवासस्थाने होती परंतु रहिवासासाठी धोकादायक म्हणून सा. बां. विभागाकडुन जाहीर करण्यात आल्याने सदर निवासस्थाने रिक्त करण्यात आली आहेत.

कल्याण येथे जलदगती न्यायालयाचे इमारतीवर दोन अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले असुन दि. २०—०८—२०१५ रोजी सदर वाढीव मजल्यांचा ताबा घेण्यात आला आहे.

कल्याण येथील जुन्या बैठया दगडी इमारती तोडुन उपलब्ध एफ.एस.आय. च्या

आधारे बहुमजली इमारत बांधण्याबाबतचे नकाशे/आराखडे तयार करणेबाबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

५. <u>लोहमार्ग न्यायालय, कल्याण.</u>

कल्याण रेल्वे पार्सल ऑफीस समोर, कल्याण (प.), पिन ४२१ ३०१ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, लोहमार्ग, कल्याण यांचे एक न्यायालय, कल्याण येथे कार्यरत असुन सदर इमारतीचे बांधकाम रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. सदर इमारतीत दि. २४—०८—२०१५ पासुन न्यायालय कार्यरत आहे.

सदरच्या न्यायालयाचे कार्यक्षेत्र ठाणे ते इगतपुरी, कल्याण ते लोणावळा व माथेरान आणि कल्याण ते पनवेल पर्यंत आहे. तसेच सदरचे न्यायालय महिन्याचे काही दिवस ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे निरनिराळया रेल्वे स्थानकांवर चालविण्यात येते.

रेल्वे प्रशासनामार्फत न्यायीक अधिका—यांकरीता निवासस्थान उपलब्ध करण्यात आले आहे.

६. <u>तालुका उल्हासनगर येथील न्यायालय.</u>

चोपडा कोर्ट, उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयाजवळ, उल्हासनगर, पिन — ४०० ००३.

उल्हासनगर न्यायालयाचा भूखंड ६५४६.६६ चौ. मीटर आहे. उल्हासनगर न्यायालय हे पुर्वी सन १९४४ साली बांधण्यात आलेल्या मिलीटरी बरॅकमध्ये कार्यरत होते. उल्हासनगर न्यायालयाची इमारत (तळमजला + २) अशी आहे. सदर इमारतीचे बांधकाम दोन भागात (Phase) करण्यात आले. पहिल्या भागाचा ताबा दि.३०—०५—१९९२ रोजी व दुस—या भागाचा ताबा दि.०५—०२—२००५ रोजी घेण्यात आला. सदर इमारतीमध्ये एकूण १० न्यायदान कक्ष उपलब्ध आहेत.

उल्हासनगर येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर अशा दोन आस्थापना असुन सद्यस्थितीत ०६ न्यायालये कार्यरत आहेत.

उल्हासनगर येथे न्यायाधीशांकरीता अभिहंस्तांकित निवासस्थाने उपलब्ध नाहीत.

७. तालुका अंबरनाथ येथील न्यायालय (प्रस्तावित)

अंबरनाथ येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयांसाठी मौजे चिखलोली, ता. अंबरनाथ जि.ठाणे येथील शासकीय जमीन सर्वे नं. ६८, क्षेत्र ९—५१—० हे. आर. यापैकी क्षेत्र ५४०० चौ.मी. या जमिनीचा आगाउ ताबा मंडळ अधिकारी, अंबरनाथ यांचेकडून दि. ११—०४—२०१६ रोजी घेण्यात आला. सदर जागेवर ०६ न्यायदान कक्ष असलेल्या न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. दि.०९/०८/२०२५ रोजी सदर इमारतीचे उद्घाटन समारंभ झाले असून तीन दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांची न्यायालये कार्यरत आहेत.

८. तालुका शहापूर येथील न्यायालय.

वन विभाग कार्यालया समोर, मौजे कळंभे, ता. शहापूर, जि. ठाणे, पिन — ४२१ ६०१.

मौजे, कळंभे, ता. शहापूर येथे न्यायालयीन इमारत व न्यायाधीशांची निवासस्थाने बांधण्यासाठी दि. ३१—०१—२००६ रोजी क्षेत्र ०—७६—२७ आर. या भूखंडाचा ताबा घेण्यात आला. सदर भूखंडावर दोन न्यायदान कक्ष व कार्यालय असलेली न्यायालयीन इमारत बांधण्यात आली असुन सदर इमारतीचे उद्घाटन दि. ०२—०२—२०१४ रोजी करण्यात आले आहे. सध्या शहापूर येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग यांची दोन न्यायालये कार्यरत आहे. शहापूर येथे न्यायिक अधिका—यांकरीता २ अभिहस्तांकीत निवासस्थाने उपलब्ध आहेत.

९. तालुका मुरबाड येथील न्यायालय.

प्राथमिक आरोग्य केंद्र मुरबाड जवळ, मुरबाड, जिल्हा ठाणे, पिन — ४२१ ४०१.

मुरबाड न्यायालयाची इमारत सी.टी. सर्व्हे नं. १५६, क्षेत्र ५८१९.४५ चौ. मी. या भूखंडावर बांधण्यात आली असुन ती बैठी कौलारु असुन ती सन १९११—१२ मध्ये बांधण्यात आलेली आहे. मुरबाड येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांचे एक न्यायालय कार्यरत आहे.

मुरबाड येथे न्यायालयीन इमारतीस लागुनच न्यायीक अधिका—यांचे एक

शासकीय अभिहस्तांकीत निवासस्थान उपलब्ध आहे. **या कार्यालयाचे पत्र दि. 02.07.2021 अन्वये मुरबाड येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधणेसाठी कार्यरत इमारतीच्या जागेचा नकाशा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर केला आहे.**

१०. <u>तालुका भिवंडी येथील न्यायालय.</u>

एस. टी. स्टॅड जवळ, भिवंडी, पिन — ४२१ ३०२ भिवंडी न्यायालयाच्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ १०,०७२.०० चौ.मी. असुन त्यावर खालीलप्रमाणे न्यायालयाच्या ०४ इमारती आहेत.

भिवंडी येथे अपर जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, या संवर्गातील एकुण १४ न्यायालये कार्यरत आहेत.

अक्र	इमारतीचे नांव	मजल्यांची संख्या	बांधकामाचे वर्ष	न्यायदान कक्ष
१	जुनी इमारत	बैठी कौलारु इमारत	१९३७—१९३८	०२
२	जुनी इमारत	बैठी कौलारु इमारत	१९५७—१९५८	०३
३	नवीन इमारत	बैठी स्लॅबची इमारत	१९९८—१९९९	०१
४	नवीन इमारत (तात्पुरती)	तळमजला ॲसबेस्टॉस शीट	२००९—२०१०	०३

उपरोक्त यादीतील अनुक्रम क्रमांक १ वरील इमारतीच्या ठिकाणी १२ न्यायदान कक्षांची नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याचा रक्कम रु. ४४,५५,३३,४६२/— इतक्या अंदाजीत खर्चाच्या प्रस्तावास शासनाने सीसीबी—१११५/प्र.क्र.१६४/का.१३ दि. ०२—०६—२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. वर्ष २०१७—१८ मध्ये रू.३८०/— लाखाच्या निधीची अर्थसंकल्पीय तरतुद केली आहे.

भिवंडी येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर अशा दोन स्वतंत्र आस्थापना आहेत. त्याचप्रमाणे भिवंडी येथे ज्युवेनाईल जस्टीस बोर्ड यांचे न्यायालय कार्यरत असुन ते बालसुधारगृह, भिवंडी येथे प्रत्येक

आठवडयात गुरुवार ते शनिवार या कालावधीत चालते.

भिवंडी येथे न्यायाधीशांकरीता १२ व चतुर्थश्रेणी कर्मचा—यांची १० अभिहंस्तांकित निवासस्थाने उपलब्ध आहेत. तसेच असुरक्षित साक्षीदार केंद्राचा ;टनसदमतंइसम ॅपजदमे क्मचवेपजपवद ब्मदजमतद्ध ताबा घेतला. **सदर इमारतीचा ताबा तळमजला + 2 मजले दिनांक 30.08.2022 रोजी घेण्यात आला.**

११. <u>तालुका वाडा येथील न्यायालय.</u>

नवीन एस. टी. वर्कशॉपजवळ, ता. वाडा, जि. ठाणे, पिन— ४२१ ३०३ वाडा येथील न्यायालयीन इमारतीच्या भूखंडाचे क्षेत्रफळ १३५०० चौ.मी. आहे. वाडा न्यायालयाची १९५५ साली बांधण्यात आलेली जुनी इमारत मोडकळीस आल्याने ती तोडून त्या जागी २ न्यायदान कक्ष व इतर अद्ययावत सुविधा असलेली प्रशस्त इमारत बांधण्यात आली. सदर इमारतीचे दि. ०६/०४/२०१४ रोजी उद्घाटन झाले असून सदर इमारतीत एक न्यायालय कार्यरत आहे.

वाडा येथे न्यायाधीशांकरीता ०१ अभिहस्तांकीत निवासस्थान उपलब्ध असुन त्याचा ताबा दि. २२—०४—२०१२ रोजी घेण्यात आला आहे. वाडा येथे वर्ग—४ कर्मचा—यांची दोन अभिहंस्तांकीत निवासस्थाने बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

१२. <u>तालुका जव्हार येथील न्यायालय.</u>

जव्हार पोस्ट ऑफिस जवळ, जव्हार, पिन ४०१ ५०३. जव्हार न्यायालयीन इमारतीच्या भुखंडाचे क्षेत्रफळ ३३३.६० चौ.मी. आहे. जव्हार येथील अस्तित्वातील न्यायालयीन इमारत जव्हार संस्थानिक यांनी न्यायालयाकरीता दिली होती. सदर इमारतीचे बांधकाम १९३४ सालचे आहे.

जव्हार येथे सध्या न्यायाधीशांकरीता एक अभिहंस्तांकित शासकीय निवासस्थान उपलब्ध आहे.

जव्हार न्यायालयाची अस्तित्वातील इमारत ही मोडकळीस आलेली असुन ती अपुरी पडत असल्यामुळे तालुका जव्हार, जिल्हा ठाणे येथे नगरपरिषद हद्दीतील नगर भूमापन क्र. २६४ पै. आरक्षण क्र.२५ येथील आरक्षित केलेल्या १२,८०० चौ. मी. शासकीय भूखंडाचा आगाऊ ताबा घेण्यात आला आहे.

सदर भूखंडावर दोन न्यायदान कक्षांची न्यायालयीन इमारत बांधण्याच्या

रु. ३,२७,४१,२२१/— इतक्या खर्चाच्या कामास शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक सीसीबी—१११३/९९८/प्र.क्र.२०५/का—१३, दि.१२—०२—२०१४ तसेच वर्ग—३ कर्मचा—यांकरीता ०२ निवासस्थाने बांधण्याच्या रु.३१,७२,५७९/— इतक्या खर्चाच्या आणि वर्ग—४ कर्मचा—यांकरीता ०४ निवासस्थाने बांधण्याच्या रु. ४५,४०,८४४/— खर्चास शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र. सीआरक्यू—१२१३/प्र.क्र.२४६/का—१३, दि. १२—०९—२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून दि.१०/०८/२०२५ रोजी सदर इमारतीचे उद्घाटन समारंभ झाले आहे. जव्हार येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांचे एक न्यायालय कार्यरत आहे.

सदर भूखंडावर न्यायाधीशांकरीता ०२ निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी प्रलंबित आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. पुढील कामे लवकरच सुरु होतील.

१३. <u>ग्राम न्यायालय, जव्हार.</u>

जव्हार येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांचे एक न्यायालय कार्यरत आहे. 'न्याय आपल्या दारी' या संकल्पने अंतर्गत ग्राम न्यायालय कायदा, २००८ अन्वये जव्हार येथे ०२ ऑक्टो., २००९ रोजी ग्राम न्यायालय कार्यान्वित करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, जव्हार हे सदर न्यायालयात 'न्यायाधिकारी' म्हणुन काम पाहतात.

१४. <u>तालुका वसई येथील न्यायालय.</u>

तहसिलदार कार्यालयाचे बाजुला, किल्ला रोड, वसई, पिन—४०१ २०१

वसई येथील न्यायालयीन इमारतीचा भुखंड २७३१.६० चौ.मी. मोजमापाचा असुन न्यायालयाच्या दोन इमारती आहेत. जुनी इमारत ही बैठी कौलारु असुन नवीन इमारत (तळ+२) मजल्यांची आहे. सदर इमारतीमध्ये एकूण ०९ न्यायदान कक्ष आहेत. जुन्या इमारतीचे बांधकाम सन १९५३—५४ चे असुन नवीन इमारत सन

२००६—२००७ मध्ये बांधण्यात आली आहे.

वसई येथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व अपर जिल्हा व सत्र न्यायाधीश अशा तीन आस्थापना कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत वसई येथे अपर जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश यांची ०३, दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांची ०४ आणि दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांची ०५ अशी एकुण १२ न्यायालये कार्यरत आहे.

१४ व्या वित्त आयोगांतर्गत अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश या संवर्गाचे न्यायालय कार्यरत आहे. वसई येथे न्यायाधीशांकरीता ०३ अभिहस्तांकित निवासस्थाने उपलब्ध आहेत. वसई येथील न्यायालयीन इमारत अपुरी पडत असल्यामुळे मौजे वसई येथील लॅण्ड बिअरिंग क्र.३७६, सर्व्हे नं.२७ क्षेत्र १०६८३.४० चौ.मी. या भुखंडाचा करारनामा दि. १७—०४—२०२५ रोजी करण्यात आला आहे. सदर जागेचा ताबा घेण्यात आला आहे. सदरच्या भुखंडावर ४० न्यायदान कक्षांची न्यायालयीन इमारत व न्यायाधीशांकरीता निवासस्थाने बांधणे प्रस्तावित आहे.

१५. <u>लोहमार्ग न्यायालय, विरार.</u>

फलाट क्र. २, विरार रेल्वे स्थानक, विरार (प.), पिन ४०१ ३०३ विरार रेल्वे स्थानकावर लोहमार्ग न्यायालयाचे कार्यालय आहे. सदरच्या न्यायालयाकरीता रेल्वे प्रशासनामार्फत इमारत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

वसई रोड रेल्वे स्थानकावरील फलाट क्र. १ वरील रेल्वे प्रशासनाचे इमारतीमध्ये न्यायालयीन प्रकरणांची सुनावणी चालते. सदर न्यायालयाचे कार्यक्षेत्र मिरारोड ते घोलवड असे असुन निरनिराळया रेल्वे स्थानकांवर महिन्याचे काही दिवस ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे न्यायालय चालते.

१६. <u>तालुका पालघर येथील न्यायालय.</u>

एम. आय. डी. सी. रोड, पालघर (पश्चिम) पिन — ४०१ ४०४ पालघर येथील न्यायालयीन इमारतीचा भुखंडाचे क्षेत्रफळ ९,४१८.४० चौ. मी. आहे. पालघर येथे न्यायालयाच्या दोन इमारती असुन जुनी इमारत १९७३—७४ साली व जलदगती न्यायालयाची इमारत सन २००३—०४ मध्ये बांधण्यात आलेली

आहे.

पालघर येथे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर व अपर जिल्हा व सत्र न्यायालय अशा तीन स्वतंत्र आस्थापना कार्यरत आहेत.

पालघर येथे अपर जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश यांचे ०२, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे ०३ आणि न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांची ०४ अशी एकुण ०९ न्यायालये कार्यरत आहेत.

पालघर येथे न्यायिक अधिकाऱ्यांकरीता ७ अभिहंस्तांकीत निवासस्थाने उपलब्ध आहेत.

पालघर येथे नवीन विस्तारित इमारत (तळमजला + २) बांधण्याच्या रु. ३,६८,५८,८६४/— इतक्या खर्चास शासन निर्णय, विधी व न्याय क्रमांक सीसीबी—१११३/८४८/प्र.क्र.१८२/का.१३, दि. १४—०७—२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. परंतु, पालघर न्यायालयाची इमारत सखल भागात असल्याने पावसाळी दिवसात तेथे पाणी साठत असल्याने विस्तारीत इमारत तळमजला + २ ऐवजी स्टिल्ट+ ३ मजले बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पालघर विस्तारीत इमारतीचे उद्घाटन समारंभ दि. २१/०१/२०२४ रोजी संपन्न झाला व सदर इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश, क. स्तर हे न्यायालय कार्यरत झाले आहे.

जिल्हा न्यायालयाची इमारत, पालघर – टेरेस फ्लोअर स्लॅब ७५ : मर्यादेपर्यत टाकण्यात आले आहे. तळमजल्यावरील ब्लॉकवर्क, पहिला मजला पुर्ण झाला. अंतर्गत प्लास्टर आणि जिप्समचे काम प्रगतीपथावर आहे. लाकडी चौकटीचे काम आणि खिडक्यांसाठी संगमरवरी फ्रेमचे काम प्रगतीपथावर आहे. FF आणि SF येथे प्लंबिंगचे काम आणि सॅनिटरी फिटिंग्ज काम प्रगतीपथावर आहे. FF आणि SF शौचालयांमध्ये वॉटरप्रूफिंगचे काम प्रगतीपथावर आहे. पोर्च परिसरात बाहय प्लास्टरचे काम सुरु आहे.

१७. <u>तालुका डहाणू येथील न्यायालय.</u>

पार नाका, डहाणू मेन रोड, पिन — ४०१ ६०१

डहाणू न्यायालयीन इमारतीचा भुखंड ७९३६.४० चौ.मी. क्षेत्रफळाचा असुन

तेथे न्यायालयाच्या दोन इमारती आहेत. न्यायालयाची जुनी इमारत बैठी कौलारु असुन ती १९०८ साली बांधण्यात आलेली आहे. न्यायालयाची नवीन इमारत (तळमजला +२) ही सन २०१० मध्ये बांधण्यात आली असुन सदर इमारतीमध्ये ०६ न्यायदान कक्ष आहेत.

डहाणु येथे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायादंडाधिकारी, प्रथम वर्ग व सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग अशा दोन स्वतंत्र आस्थापना आहेत. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांचे न्यायालया सकट एकूण ०२ न्यायालये कार्यरत आहेत.

डहाणू येथे नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालये कार्यरत असुन जुन्या इमारतीमध्ये अभिलेख ठेवण्यात आला आहे.

डहाणू येथे न्यायाधीशांकरीता दोन अभिहंस्तांकित निवासस्थाने उपलब्ध आहेत.

उपलब्ध सेवा : फौजदारी, दिवाणी मोटार अपघातग्रस्त, वैवाहिक वाद ई. तसेच पिडीतांना कायद्यातील तरतुदीनुसार न्याय निर्णय देणे. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा मार्फत नियमानुसार असहाय्य तसेच पिडीतांना मोफत सल्ला देणे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा मार्फत लोक अदालत चे आयोजन करण्यात येते व तडजोडीच्या मार्गाने प्रकरणे निकाली काढण्यात येतात. तसेच समाजात कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी विविध ठिकाणी कायदेविषयक मार्गदर्शनपर शिबीरे आयोजीत करण्यात येतात.

---***---

संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील :


कार्यालयीन दुरध्वनी कमांक	:	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे. (022) 25474574
ई– मेल	:	mahthadc@mhstate.nic.in
कार्यालयीन वेळ	:	सकाळी 10:30 ते सायंकाळी 6.00
जेवणाची वेळ	:	दुपारी 2:00 ते 2:30 (अर्धा तास)
साप्ताहिक सुट्टी आणि	:	रविवार तसेच प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा विशिष्ट सेवेसाठी शनिवार. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठरविलेल्या वेळा ठरलेल्या कार्यकमानुसार सुट्टीच्या दिवशी सुध्दा कार्यशाळा, लोकन्यायालय व शिबीरे घेण्यात येतात.

ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिपत्याखालिल न्यायालयांचे कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक .

अ. क	न्यायालयाचे नांव	कार्यालयीन दुरध्वनी कमांक
1	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे	022 – 25474574
2	दिवाणी न्यायालय व. स्तर, ठाणे	022 – 25476772
3	मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे	022 – 25470275
4	जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे	022 – 25476441
5	मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, ठाणे	022 – 25475838
6	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पहिले न्यायालय, ठाणे	022 – 25471565
7	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग दुसरे न्यायालय, ठाणे	022 – 25470096
8	दिवाणी न्यायालय, भिवंडी	02522 – 253250
9	सह दिवाणी न्यायालय, भिवंडी	02522 – 222660
10	दिवाणी न्यायालय, डहाणु	02528 – 222107
11	सह दिवाणी न्यायालय, डहाणु	02528 – 221575
12	दिवाणी न्यायालय, जव्हार	02520 – 222565
13	अतिरिक्त जिल्हा न्यायालय, कल्याण	0251 – 2311617
14	दिवाणी न्यायालय व स्तर, कल्याण	0251 – 2311033
15	दिवाणी न्यायालय क स्तर, कल्याण	0251 – 2317108
16	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पहिले न्यायालय, कल्याण	0251 – 2315573
17	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिसरे न्यायालय, कल्याण	0251 – 2311618
18	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रेल्वे न्यायालय, कल्याण	0251 – 2312270
19	दिवाणी न्यायालय क स्तर, मुरबाड	02524 – 222433
20	अतिरिक्त जिल्हा न्यायालय, पालघर	02525 – 256754
21	दिवाणी न्यायालय व. स्तर, पालघर	02525 – 252828
22	दिवाणी न्यायालय क. स्तर, पालघर	02525 – 254959
23	दिवाणी न्यायालय क. स्तर, शहापुर	02527 – 272016

24	दिवाणी न्यायालय क. स्तर, उल्हासनगर	0251 – 2730388
25	सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उल्हासनगर	0251 – 2704014
26	दिवाणी न्यायालय, वाशी	022 – 27580082
27	अतिरिक्त जिल्हा न्यायालय, वसई	0250 – 2325485
28	दिवाणी न्यायालय व. स्तर, वसई	0250 – 2325497
29	दिवाणी न्यायालय क. स्तर, वसई	0250 – 2324224
30	दिवाणी न्यायालय क. स्तर, वाडा	02526 – 271470
31	न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रेल्वे न्यायालय, विरार	022 – 67639025
32	दिवाणी न्यायालय, क. स्तर, मिरा–भाईंदर	
33	दिवाणी न्यायालय, क. स्तर, चिखलोली अंबरनाथ	

संस्थेचा प्रारुप तक्ता



कलम 4 (1) (b) (ii)

नमुना (अ)
ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालय या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील.

अ

अ. क्र.	पदनाम	अधिकार–प्रशासकीय	कोणत्या कायद्या / नियम / शासननिर्णय / परिपत्रका नुसार	अभिप्राय
१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे.	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्या अंतर्गत येणाऱ्या न्यायालयाच्या संबंधी प्रशासकीय अधिकार, कर्मचारी नेमणूक, पदोन्नती, बदली व शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे अधिकार	प्रचलित कायद्यानुसार व माननीय उच्च न्यायालयाचे अधिनस्त व विविध नियमानुसार व प्रशासकीय प्रकरणात शासकीय अधिनियमा प्रमाणे.	– –

ब

अ. क्र.	पदनाम	अधिकार–आर्थिक	कोणत्या कायद्या / नियम / शासननिर्णय / परिपत्रका नुसार	अभिप्राय
१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे.	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्या अंतर्गत येणाऱ्या न्यायालयाच्या संबंधी आर्थिक अधिकार	प्रचलित कायद्यानुसार व माननीय उच्च न्यायालयाचे अधिनस्त व विविध नियमानुसार व वित्तीय प्रकरणात शासकीय अधिनियमा प्रमाणे.	– –

क

अ. क्र.	पदनाम	अधिकार–न्यायिक	कोणत्या कायद्या / नियम / शासननिर्णय / परिपत्रका नुसार	अभिप्राय
१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे.	दिवाणी व फौजदारी व्यवहार संहितेमध्ये नमुद जिल्हा व सत्र न्यायाधीशांना चालविण्या योग्य सर्व खटले/ प्रकरणे चालविणे. दिवाणी न्यायाधीश व न्याय दंडाधिकारी यांचे निकालाविरुध्द दाखल करण्यात आलेली अपीले चालविणे. शासन व मा.उच्च न्यायालय यांच्याकडून देण्यात आलेल्या विशेष अधिकारान्वये विशेष स्वरुपाचे फौजदारी खटल्यांमध्ये न्यायनिर्णय देणे	दिवाणी व फौजदारी व्यवहार संहिता तसेच शासनाकडून व मा. उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी प्रदान करण्यात आलेल्या विशेष अधिकारानुसार	– –
२	जिल्हा न्यायाधीश–१ व अति. सत्र न्यायाधीश, ठाणे व ईतर जिल्हा न्यायाधीश, ठाणे	वर नमुद केल्याप्रमाणे प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या अधिकार कक्षेतील व वाटप करण्यात आल्याप्रमाणे दिवाणी / फौजदारी प्रकरणात न्यायनिर्णय देणे.	वरीलप्रमाणे	– –

ड

अ. क्र.	पदनाम	अधिकार–अर्धन्यायीक	कोणत्या कायद्या / नियम / शासननिर्णय / परिपत्रका नुसार	अभिप्राय
१	लागू नाही.	लागू नाही.	लागू नाही.	लागू नाही.

कलम ४ (१) (b) (ii)

नमुना (ब)

ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालय या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्याचा तपशील

अ

अ. क्र.	पदनाम	कर्तव्ये	कोणत्या कायद्या / नियम / शासननिर्णय / परिपत्रका नुसार	अभिप्राय
१	प्रबंधक	कर्तव्यसुची प्रमाणे	माननीय उच्च न्यायालय / शासन यांचे परिपत्रक व आदेश व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे आदेशानुसार अधिनस्त	– –
२	स्वीय सहाय्यक	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
३	अधीक्षक	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
४	लघुलेखक (उच्च श्रेणी)	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
५	लघुलेखक (निम्न श्रेणी)	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
६	लघु–टंकलेखक	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
७	सहाय्यक अधीक्षक	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
८	वरिष्ठ लिपीक	–– ’’ ––	–– ’’ ––	– –
९	दुभाषी	–– ’’ ––	–– ’’ ––	– –

१०	कनिष्ठ लिपीक	-- '' --	-- '' --	- -
११	मुख्य बेलिफ	-- '' --	-- '' --	- -
१२	बेलीफ	-- '' --	-- '' --	- -
१३	वाहन चालक	-- '' --	-- '' --	- -
१४	पुस्तक बांधणीकार	-- '' --	-- '' --	- -
१५	हवालदार	-- '' --	-- '' --	- -
१६	नाईक	-- '' --	-- '' --	- -
१७	झेरॉक्स चालक	-- '' --	-- '' --	- -
१८	शिपाई / पहारेकरी	-- '' --	-- '' --	- -
१९	सफाईगार	-- '' --	-- '' --	- -

अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य

१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश	:	१.	जिल्हा न्यायालयांतर्गत तालुका, जिल्हा स्तरावर कार्यरत न्यायालयाचे कामकाजावर देखरेख करणे बाबत प्रशासनीक अधिकार.
			२.	एक करोडपर्यंतची आर्थिक मुल्य मर्यादा असलेल्या प्रकरणामधील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांच्या निकाल व हुकूमनामा विरुध्दच्या अपीलांमध्ये न्यायनिर्णय देणे.
			३.	अध्यक्ष, मोटार अपघात नुकसान भरपाई प्राधिकरण म्हणुन मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देणे.
			४.	अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण म्हणुन मोफत कायदेविषयक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे त्याकरीता शिबीराचे आयोजन करणे. दुर्बल घटकातील व्यक्तींना कायदेविषयक प्रकरणात मोफत अधिवक्त्याच्या सेवा उपलब्ध

				करुन देणे.
			५.	लवाद व समेट अधीनियम (Arbitration and Conciliation Act) चे प्रकरणात न्यायनिर्णय देणे.
			६.	दिवाणी प्रक्रिया संहीता नियम २४ व फौजदारी प्रक्रिया संहीता नियम ४०८ प्रमाणे दाखल चौकशी अर्जावर न्यायनिर्णय देणे.
			७	न्यायदंडाधिकाऱ्याने गुन्ह्याची दखल घेऊन प्रकरणे वर्ग होऊन आल्यानंतर सत्र खटल्यांत नियमानुसार पुरावा घेऊन न्यायनिर्णय देणे.
			८	फॉरेस्ट ॲक्ट अंतर्गत दाखल फौजदारी अपीलांवर न्यायनिर्णय देणे.
			९	न्यायदंडाधिकाऱ्यांनी फौजदारी प्रकरणात दिलेल्या शिक्षेबाबतचे किंवा ईतर न्यायनिर्णयाचे अपील आणि पुनर्विलोकनाची प्रकरणे निकाली काढणे.
			१०	जिल्हा व सत्र न्यायालयाचे आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.
२	न्यायाधीश, विशेष न्यायालय (मोक्का कायद्यांतर्गत)	:	१	मोक्का कायद्यांतर्गत दाखल झालेल्या सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.

३	न्यायाधीश, विशेष न्यायालय (बालसंरक्षण अधिनियमांतर्गत)	:	१	बालसंरक्षण अधिनियमांतर्गत दाखल झालेल्या सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
४	न्यायाधीश, विशेष न्यायालय (एम.पी.आय.डी. अधिनियमाअंतर्गत)	:	१	एम. पी. आय. डी. कायद्यांतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
५	न्यायाधीश, विशेष न्यायालय (महिलांवरील अत्याचार प्रकरणांसंबंधी)	:	१	महिलांवरील अत्याचारा संबंधी सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.

६	न्यायाधीश, विशेष न्यायालय (भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमा अंतर्गत)	:	१	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत दाखल झालेल्या सर्व सत्र प्रकरणामध्ये न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
७	न्यायाधीश, विशेष न्यायालय (विद्युत अधिनियम-२००३)	:	१	विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत दाखल झालेल्या सर्व प्रकरणांमध्ये नियमानुसार न्यायनिर्णय देऊन प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
८	न्यायाधीश, विशेष न्यायालय (एन.डी.पी.एस. ॲक्ट)	:	१	एन. डी. पी. एस. कायद्याखालील सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.

			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
९	न्यायाधीश, विशेष न्यायालय (Drugs & Cosmetic Act)		१	Drugs & Cosmetic कायद्याखालील सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
१०	न्यायाधीश, विशेष न्यायालय (अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अंतर्गत)		१	अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ कायद्याखालील सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
११	न्यायाधीश, विशेष न्यायालय (Right of Persons with Disablities Act, 2016)		१	Right of Persons with Disablities Act, 2016 कायद्याखालील सर्व प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन

				प्रकरणे निकाली काढणे.
			३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
१२	अतिरिक्त/सहा. जिल्हा व सत्र न्यायाधीश	:	१ २. ३. ४. ५. ६. ७. ८.	दिवाणी अपीले/पुर्नविलोकन अर्ज, किरकोळ दिवाणी अपीले, दिवाणी चौकशी अर्ज तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारचे सर्व सत्र प्रकरणे, फौजदारी अपील व पुनर्विलोकन प्रकरणे निकाली काढणे. गार्डीयन ॲन्ड वार्डस् ॲक्ट खालील प्रकरणांत न्यायनिर्णय देणे. मॅरेज पिटीशन (under Divorce Act & Special Mariage Act) प्रकरणांत तसेच महाराष्ट्र रेंट कंट्रोल ॲक्ट खालील पुनर्विलोकन अर्जात न्यायनिर्णय देणे. बी.पी.एम.सी. ॲक्ट अतंर्गत दाखल अपीलांवर न्यायनिर्णय देणे. Bombay Government Premises (Eviction) Act & Bombay Public Premises (Eviction) Act अंतर्गत दाखल अपिलांवर न्यायनिर्णय देणे. Bombay Public Turst Act अंतर्गत दाखल अपिलांवर न्यायनिर्णय देणे. ट्रेडमार्क ॲक्ट नुसार दाखल होणारे दिवाणी दावे व स्टेट फायनान्शिअल कार्पोरेशन ॲक्ट नुसार दाखल होणा–या दिवाणी चौकशी अर्जांमध्ये न्यायनिर्णय देणे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी नेमून दिलेले सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.

१३	सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण.	:	१	मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, चौकशी अर्ज, दरखास्त इ. मध्ये न्यायनिर्णय देणे.
			२	मोटार अपघार प्राधिकरण आस्थापनेवरील सर्व प्रशासकीय कामकाज पाहणे.
१४	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर	:	१	दिवाणी नियमावली व दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार रुपये पाच लाखापेक्षा जास्त आर्थिक मुल्य मर्यादा असलेली दिवाणी प्रकरणे आणि शासनाने दाखल केलेली किंवा शासनाचे विरोधात दाखल केलेली दिवाणी प्रकरणे निकाली काढणे.
			२	हिंदू मॅरेज ॲक्ट अंतर्गत दाखल झालेल्या विवाह याचिकांमध्ये न्यायनिर्णय देणे.
			३	एल. ए. आर. रेफ्रन्सचे प्रकरणांत न्यायनिर्णय देणे.
			४	दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.
१५	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर	:	१	दिवाणी नियमावली व दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार रुपये पाच लाखापर्यंतची आर्थिक मुल्य मर्यादा असलेली दिवाणी प्रकरणे निकाली काढणे.
			२	दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.
१६	मुख्य न्यायदंडाधिकारी	:	१	फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये गुन्ह्याची दखल घेणे व फौजदारी प्रकरणे न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाच्या आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.

१७	न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी	:	१	फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये गुन्ह्याची दखल घेणे व फौजदारी प्रकरणे न्यायनिर्णय देऊन निकाली काढणे.
			२	न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाच्या आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.
१८	बाल न्यायमंडळ	:	१	बाल गुन्हेगारी कायद्यांतर्गत दाखल झालेल्या सर्व प्रकरणांत न्यायनिर्णय देणे.
			२	बाल न्यायमंडळाच्या आस्थापनेबाबत प्रशासकीय कामकाज पाहणे.

कर्मचाऱ्यांची वर्गवारी

१. द्वितीय श्रेणी	:	१.	प्रबंधक
		२.	लघुलेखक (ग्रेड—१)
२. तृतीय श्रेणी	:	१.	लघुलेखक (ग्रेड—२)
		२.	लघुलेखक (ग्रेड—३)
		३.	अधिक्षक
		४.	सहाय्यक अधिक्षक
		५.	लघु—टंकलेखक
		६.	वरिष्ठ लिपीक
		७.	कनिष्ठ लिपीक
		८.	मुख्य बेलीफ
		९.	बेलीफ
		१०.	वाहन चालक
		११.	पुस्तक बांधणीकार
		१२.	दुभाषी
३. चतुर्थ श्रेणी	:	१.	हवालदार / नाईक
		२.	झेरॉक्स चालक
		३.	शिपाई / पहारेकरी
		४.	सफाईगार

जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांची विभागवार कर्तव्ये

प्रबंधक कार्यालय :

कार्यालय प्रमुख : प्रबंधक

१. दिवाणी व फौजदारी अपील, चौकशी अर्ज, दावे, उजळणी अर्ज, पुनर्विलोकन अर्ज इ. दाखल करून घेणे.

२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांना खालील बाबींमध्ये सहाय्य करणे.

   अ. पक्षकारांनी कर्मचाऱ्यांच्या विरूध्द व न्यायालयाच्या विरूध्द केलेले तक्रारी अर्ज सादर करणे.

   ब. पक्षकारांनी वकीलांविरूध्द केलेले तक्रारी अर्ज सादर करणे.

   क. खातेनिहाय चौकशी बाबतची प्रकरणे हाताळणे.

   ड. सर्व गोपनीय बाबी हाताळणे.

   इ. कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा घेणे.

   फ. उन्हाळी सुट्टी व सार्वजनिक सुट्ट्या ठरविणे.

   ग. जिल्हयातील सर्व न्यायधीशांच्या वार्षिक सभेचे आयोजन करणे.

३. जिल्हा न्यायालयातील सर्व शाखांवर देखरेख करणे व कामाचे वाटप करणे.

४. उच्च न्यायालय, मुंबई, शासकीय व प्रशासकीय पत्र व्यवहार करणे.

५. जिल्हयातील सर्व आस्थापनांवरील कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल सांभाळणे.

६. माहिती अधिकाराखाली आलेल्या अर्जांवर निकाल देणे व त्यासंबंधी पत्र व्यवहार हाताळणे.

७. नोंद वहयांवर सहय्य करणे.

८. नेमणुका, बदल्या, बढत्या व जिल्हयातील कर्मचाऱ्यांच्या खातेनिहाय चौकशी ही कामे हाताळणे.

स्विय सहाय्यक जिल्हा न्यायाधीश :

१. दिवाणी व फौजदारी प्रकरणांमधील न्याय निर्णय व आदेश श्रुतलेखनात घेणे व टंकलिखित करणे.

२. प्रशासकीय पत्र व्यवहार, कार्यालयीन व प्रशासकीय आदेश, तपासणी टिपण, कालबध्द प्रशासकीय अहवाल न्यायाधीशांच्या आदेशाप्रमाणे तयार करणे.

३. जिल्हा न्यायाधीशांकडील गोपनिय कामकाज व अभिलेख सांभाळणे.

४. न्यायधीशांनी नेमून दिलेली इतर कामे करणे.

आस्थापना विभाग :

विभाग प्रमुख : सहाय्यक अधिक्षक

१. प्रबंधकांच्या देखरेखीखाली सर्वसाधारण पत्र व्यवहार सांभाळणे.

२. कर्मचाऱ्यांच्या रजेबाबतची प्रकरणे सांभाळणे व पत्र व्यवहार करणे.

३. कर्मचाऱ्यांच्या नेमणुका व बदलीबाबतचा पत्र व्यवहार सांभाळणे.

४. तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीकामी प्रतिक्षा यादी तयार करणेबाबत कार्यवाही करणे.

५. तृतिय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत कार्यवाही करणे.

६. तृतिय श्रेणी कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षांबाबत कार्यवाही करणे.

७. कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत कार्यवाही करणे.

८. कर्मचाऱ्यांच्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करणे.

९. कर्मचाऱ्यांच्या आगाऊ वेतनवाढी देणेबाबत कार्यवाही करणे.

१०. कर्मचाऱ्यांचे सेवा जेष्ठता सुची तयार करणे.

११. शिस्तभंग केल्याप्रकरणी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची प्राथमिक कार्यवाही सुरु करणे.

१२. कार्यालयीन आदेश व परिपत्रके तयार करणे.

१३. गोपनीय पत्र व्यवहारांचे दप्तर सांभाळणे.

१४. कर्मचा—यांचे गोपनीय अहवाल सांभाळणे.

१५. जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके सांभाळणे, नोंदी घेणे.

१६. जिल्हयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी मंजूर करणे व तत्संबंधीचा पत्र व्यवहार हाताळणे.

१७. कार्यालयीन आदेश व रजा आदेश संबंधित नोंद वहीत नोंदविणे.

राजपत्रित अधिकारी विभाग :

विभाग प्रमुख : सहाय्यक अधिक्षक

१. न्यायीक अधिकाऱ्यांच्या किरकोळ रजेचे अर्ज प्रमुख जिल्हा न्यायाधीशांपुढे ठेवुन तत्संबंधीचा पत्र व्यवहार करणे.

२. जिल्हयातील न्यायीक अधिकाऱ्यांच्या किरकोळ रजेची नोंद वही सांभाळणे.

३. न्यायीक अधिकाऱ्यांच्या बदल्या व नेमणुकांबाबतचा पत्र व्यवहार सांभाळणे.

३. दुय्यम न्यायालयातील कामकाजाचा गोषवारा घेऊन आवश्यक ठिकाणी न्यायीक अधिका—यांच्या नेमणुकांबाबत प्रस्ताव तयार करून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पाठविणे.

४. जिल्हा न्यायालयातील राजपत्रित अधिकाऱ्यांची वेतन देयके तयार करणे.

५. राजपत्रित अधिकाऱ्यांची पुरक वेतन देयके, प्रवास भत्ता देयके, वैद्यकीय खर्चाची देयके व इतर देयके बनविणे.

६. न्यायीक अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे (Workshop) आयोजन

करणे.

७. न्यायीक अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीची कागदपत्रे तयार करणे व त्यासबंधी पत्र व्यवहार सांभाळणे.

कर्तव्यसूची (Duty List)

प्रशासन विभाग :

विभाग प्रमुख : अधिक्षक

१. मुख्य व गौण कामाचा पत्र व्यवहार करणे.

२. लेखन सामुग्री प्रपत्रे आणि प्रमाणपत्रे यासाठी मागणीपत्र तयार करणे.

३. गणवेश, छत्री यासाठी मागणीपत्र तयार करणे.

४. कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीची कागदपत्रे तयार करणे व त्यासबंधी पत्र व्यवहार सांभाळणे.

५. प्रशासनाबाबत सर्वसाधारण पत्र व्यवहार सांभाळणे.

६. जिल्हा न्यायालयाच्या इमारतीची देखभाल ठेवणे.

७. टपाल विभागावर देखरेख ठेवणे टपाल तिकीटांचा हिशोब तपासणे.

८. वकिलांचे लिपिक, तसेच पिटीशन रायटर नेमणूकीबाबतच्या अर्जांवर कार्यवाही करणे.

९. वकीलांचे लिपिक व पिटीशन रायटर यांची नोंदवही ठेवणे.

१०. पिटीशन रायटरच्या कामावर देखरेख ठेवणे व हिशोब तपासणे.

कर्तव्यसूची (Duty List)

न्यायीक विभाग (Judicial Branch)

विभाग प्रमुख : अधिक्षक

१. दिवाणी व फौजदारी नोंदवहया सांभाळणे व नवीन दाखल होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करून क्रमांक देणे व नोंदी घेणे.

२. दिवाणी व फौजदारी प्रकरणे एका न्यायालयातुन दुसऱ्या न्यायलयात वर्ग करणे बाबतचे आदेश घेणे.

३. प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये न्यायधीशांचे प्रथम आदेश घेणे.

४. प्राप्त दिवाणी व फौजदारी प्रकरणांची संबंधित नोंद वहीत नोंद करणे.

५. न्यायालयीन आदेशानुसार कामगीरी करणे.

६. कामगीरी नोंद वहीत (Process Register) नोंदी घेणे.

७. कामगीरी शुल्क नोंद वहीत (Process Fee Book) नोंदी घेणे.

८. दैनिक मुद्रांक नोंद वहीत (Daily Court Fee Register) नोंदी घेणे.

९. हुकूमनामे वर्ग करण्याबाबत पत्र व्यवहार सांभाळणे व त्यासंबंधीच्या नोंदी संबंधित नोंदवहीत घेणे.

१०. सत्र न्यायालयातून प्राप्त झालेली तिमाही, सहामाही व वार्षिक विवरण पत्रके तपासणे, एकत्रित ताळेबंद तयार करून व नियोजीत वेळेत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पाठविणे व प्राप्त शेरे संबंधित न्यायीक अधिका—यांना कळविणे.

११. सत्र न्यायालयातील कामकाजाचा गोषवारा घेऊन आवश्यक ठिकाणी न्यायीक अधिका—यांच्या नेमणुकांबाबत प्रस्ताव तयार करणे.

१२. सत्र न्यायालयासंबंधी इतर कामकाज सांभाळणे

फौजदारी शिरस्तेदार विभाग (सांख्यिकी) :

विभाग प्रमुख : वरीष्ठ लिपीक

१. दुय्यम न्यायालयातून प्राप्त झालेली तिमाही, सहामाही व वार्षिक विवरण पत्रके तपासणे, एकत्रित ताळेबंद तयार करून व नियोजीत वेळेत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पाठविणे व प्राप्त शेरे संबंधित न्यायीक अधिका—यांना कळविणे.

२. दुय्यम न्यायालयातील कामकाजाचा गोषवारा घेऊन आवश्यक ठिकाणी न्यायीक अधिका—यांच्या नेमणुकांबाबत प्रस्ताव तयार करणे.

३. जामीनदाराची ' ए ' व ' बी ' याद्या तयार करणे व बी यादी जिल्हयातील सर्व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांना पाठविणे.

४. विशेष न्यायदंडाधिकारी यांचेकडून आलेली मासिक विवरणपत्रके व त्या अनुषंगाची इतर पत्रके तपासणे, त्यावर सत्र न्यायाधीशांचा शेरा घेऊन ती मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे पाठविणे. विवरणपत्रावरील संबंधित शेरे विशेष न्यायदंडाधिकारी यांना कळविणे.

५. दिवाणी व फौजदारी कामाची वार्षिक विवरणपत्रे तयार करणे व ती उच्च न्यायालयास पाठविणे.

<u>शिरस्तेदार :</u>

१. न्यायीक अधिका—यांनी सांगितलेल्या कामांची पूर्तता करणे.

२. दैनिक खर्डा सुचना पटलावर जाहीर करणे.

३. न्यायाधीशांसमोर खडर्यानुसार दिवाणी व फौजदारी प्रकरणे ठेवणे व आदेश घेणे.

४. दिवाणी व फौजदारी प्रकरणांमधील रोजनामे लिहीणे.

५. दिवाणी व फौजदारी जंत्री तयार करणे.

६. हुकूमनामे तपासणे.

७. अटक वॉरंट व सुटका वॉरंट (Release) तपासणे व त्यावर न्यायाधीशांच्या सहया घेणे.

८. सहाय्यक अधिक्षक, रोख व वित्त या कार्यालयाकडे संबंधित प्रकरणांमधील कागदपत्रे दंडाच्या नोंदी घेण्याकरीता पाठविणे व दंड रकमेची वसुली करणे कामी योग्य ती कार्यवाही करणे.

९. दिवाणी व फौजदारी प्रकरणांतील आदेश पुढील कार्यवाहीकरीता संबंधितास पाठविणे.

१०. सेशन केसेसमधील मुद्देमाल नष्ट करणेबाबतचे आदेश मुद्देमाल विभागास पाठविणे.

११. मासीक, चारमाही, सहामाही व वार्षिक विवरणपत्रे तयार करणे व संबंधित विभागाकडे पाठविणे.

१२. न्यायाधीशांच्या ग्रंथालयातील पुस्तके सांभाळणे व पुस्तकांची यादी (Catalogue) तयार करणे.

१३. दाव्यांचा व खटल्यांचा सुड (Balance sheet) तयार करणे.

१४. न्यायाधीशांच्या आदेशान्वये पत्र व्यवहार सांभाळणे.

१५. दैनिक मुद्रांक नोंद वहीत (Daily Court Fee Register) नोंदी घेणे.

<u>सहाय्यक शिरस्तेदार :</u>

१. दुय्यम न्यायालयातून मागविलेल्या कामकाज व अभिलेखाची तपासणी करणे व त्याबाबत योग्य त्या नोंदी घेणे.

२. पेपरबुक तयार करणेकामी दप्तरदार विभागात कामकाज व अभिलेख पाठविणे.

३. न्यायालयीन आदेशानुसार कामगीरी करणे.

४. न्यायालयासमोरील जबान्या नोंदविणे.

५. अटक वॉरंट तयार करणे.

६. दिवाणी व फौजदारी निकाल संबंधित नोंदवहीत नोंदविणे.

७. न्यायनिर्णयाच्या प्रती संबंधित न्यायालय, पोलीस व कारागृह अधिका—यांस पाठविणे.

८. निकाली प्रकरणे नोंदी घेऊन मोस्तर तयार करून दप्तरदार विभागास पाठविणे.

९. दुय्यम न्यायालयाकडुन मागविलेला कामकाज व अभिलेख निकालाच्या प्रतीसह संबंधित न्यायालयास पाठविणे.

१०. टंकलेखनाचे काम करणे.

११. प्रकरण सुनावणीस येईपर्यंत रोजनामा लिहीणे.

१२. दैनिक खर्डा तयार करणे.

१३. हुकूमनामे तयार करणे.

१४. उच्च न्यायालय तसेच वरिष्ठ न्यायालयातील रिटांची नोंद वहीत नोंद घेणे व आदेशानुसार पुढील कार्यवाही करणे.

१५. दिवाणी व फौजदारी प्रकरणांच्या नोंदी संगणकात अद्ययावत (Update) करणे.

कर्तव्यसूची (Duty List)

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण (M.A.C.T.)

विभाग प्रमुख : अधिक्षक

१. मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे स्विकारणे, तपासणे, त्यांना क्रमांक देणे व संबंधित रजिस्टरमध्ये नोंदी घेणे.

२. रोख वही—आय (Cash Book- I) लिहीणे.

३. सर्वसाधारण रोख वही (General Cash Book) लिहीणे.

४. लेखासंबंधिचे सर्व कामकाज करणे.

५. नकलेचे अर्ज स्विकारणे व त्यानुसार सत्यप्रती संबंधीत पक्षकारांना देणे, त्याबाबत हिशोब ठेवणे.

६. संबंधित नोंद वहयांमध्ये नोंदी घेणे.

७. दाव्यातील अवार्ड तयार करणे.

ग्रंथालय विभाग :

विभाग प्रमुख : वरीष्ठ लिपीक

१. शासकीय राजपत्रे, शासन निर्णय, परिपत्रके इ. सांभाळणे व त्यांची नस्ती तयार करणे.

२. पुस्तकांची यादी (Catalogue) तयार करणे व यादीनुसार पुस्तके तपासणे व न्यायाधीशांना अहवाल सादर करणे.

३. न्यायालयीन वाहनांवर देखरेख ठेवणे व वाहनांच्या देखभालीबाबत कार्यवाही करणे.

४. वाहन चालकांचे कामावर देखरेख ठेवणे.

५. पेट्रोल वही, सरासरी वही (Average Book) वाहनाबाबतची माहीती पुस्तीका (Vehicle History Book) ठेवणे.

संगणक विभाग :

विभाग प्रमुख : सहाय्यक अधिक्षक

१. संगणक कार्यप्रणालीची देखभाल करणे.

२. क्लायंट/थिन क्लायंट, प्रिंटर्सची जोडणी करणे.

३. दैनिक व साप्ताहीक बॅकअप घेऊन बॅकअप नोंदवही ठेवणे.

४. सीआयएस प्रणालीकरीता वेगवेगळे युजर्स् तयार करणे.

५. युजर्स् नोंदवही / सीआयएस अहवाल नोंदवही ठेवणे व त्यावर प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या सहया घेणे.

६. शासनाकडून व मा. उच्च न्यायालयाकडून फॅक्स व ई—मेल द्वारा प्राप्त झालेल्या सुचनांची नस्ती ठेवणे.

७. संगणकीय नोंदी अद्ययावत ठेवणे.

८. तालुका सिस्टीम ॲडमीनिस्ट्रेटर्स्ना प्रशिक्षण देणे.

९. जिल्हयातील न्यायाधीश व कर्मचा—यांना सीआयएस प्रणालीबाबत प्रशिक्षण देणे.

१०. तालुका न्यायालयात आवश्यकतेनुसार भेट देऊन संगणकीय प्रणाली सुस्थितीत ठेवणे.

११. संगणकीय प्रणालीबाबतचे परवलीचे शब्द (Password) गोपनीयरित्या जतन करणे. सदर परवलीचे शब्द लखोटयात सिलबंद करून ते जिल्हा न्यायाधीशांकडे सुपूर्द करणे.

१२. वस्तुसंग्रह नोंदवही ठेवणे व टेप, सी.डी., रिबन, पेपर इत्यादी वस्तुंचा साठा जतन करणे.

१३. प्रत्येक न्यायालयानुसार हार्डवेअर यादी ठेवणे, संगणक साहीत्याबाबत आवश्यकतेनुसार मागणी, दुरुस्ती इत्यादी बाबत सर्व कार्यवाही करणे.

१४. ई—मेल घेणे व पाठविणे.

१५. उच्च न्यायालय व एन.आय.सी. कडुन प्राप्त झालेले नवीन सॉफ्टवेअर इंस्टॉल करणे व माहिती अद्ययावत ठेवणे.

१६. कालबध्द विवरण पत्र पाठविणे.

१७. संगणकाबाबत निर्माण झालेल्या अडचणी संबंधितांकडुन (Vendor) दुरूस्त करून घेणे.

१८. संगणक कार्यप्रणालीवर लक्ष ठेवणे व किरकोळ अडचणी सोडविणे.

१९. वेगवेगळया न्यायालयातील/विभागातील फायलींग काऊंटरवरील संगणक प्रणालीवर लक्ष ठेवणे व अडचणी दूर करणे.

<u>लिपिक संगणक विभाग :</u>

१. जिल्हा न्यायालय, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, दिवाणी न्यायालय, व. स्तर, मुख्य न्यायालय, ठाणे येथील नविन दाखल झालेले दिवाणी तसेच फौजदारी प्रकरणांची सी.आय.एस. प्रणाली मधील फाईलींग युजर, रजिस्ट्रेशन अलोकेशन नुसार नोंद घेणे.

२. वकील व पक्षकार यांनी विचारलेल्या दिवाणी व फौजदारी प्रकरणाची KIOSK नुसार सद्य:स्थिती/माहिती देणे.

३. संगणक प्रमुख न्यायीक अधिकारी, प्रबंधक व सिस्टम ॲडमिनिस्ट्रेर यांनी सांगितलेली कामे करणे.

<u>रोख व वित्त विभाग :</u>

<u>विभाग प्रमुख : सहाय्यक अधिक्षक</u>

१. जिल्हयातील कर्मचा—यांची वेतननिश्चिती करणे.

२. कर्मचा—यांचे वेतन, प्रवासभत्ता, आगाऊ रक्कम, आकस्मीक खर्च इत्यादी सर्व प्रकारच्या देयकांची कामे पहाणे.

३. दिवाणी व फौजदारी प्रकरणांतील रकमांबाबत संबंधित रजिस्टर्सना नोंदी घेणे.

